केस नं. रेफ.आयडीए नं.45/2018
निशाणी यु–09

**शपथेवर साक्षीदाराची पुढील उलटतपासणी – प्रथमपक्षातर्फे विधीज्ञ श्री. पी.एल.शहाणे यांच्याव्दारा**

01. मी आज रोजी साक्ष एकुण सर्व 31 व्दितीयपक्ष यांचेमार्फत देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, व्दितीय पक्ष क्र.1,2,3,4,6,9,11 ते 15,18, 23, 29 व 30 हे औरंगाबाद जिल्हयात कार्यरत आहेत. हे म्हणणे खरे आहे की, व्दितीय पक्ष क्र.5,7, 16,17, 19 ते 22, 24 ते 28 व 31 हे 14 लोक जालना जिल्हयात कार्यरत आहेत. हे म्हणणे खरे आहे की, व्दितीयपक्षाने पुराव्याचे शपथपत्र दिले त्यावेळेस गणेश सोनवणे हे येवला, नाशिक येथे कार्यरत होते. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, त्याला डेप्युटेशनवर येवला येथे पाठविण्यात आले होते. व्दितीयपक्ष क्र.10 संतोष हे लोणी खुर्द ता.वैजापुर येथे कार्यरत आहेत. हे म्हणणे खरे आहे की, जालना, नाशिक, अहमदनगर येथे देखील कामगार न्यायालय आहेत. हे म्हणणे खरे आहे की, औरंगाबाद जिल्हयाव्यतिरिक्त इतर ठिकाणी राहणा–या व्दितीयपक्षांनी त्यात्या जिल्हयात त्यांना कायम करावे म्हणुन प्रकरण दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, या कोर्टास सर्व 31 व्दितीयपक्षांतर्फे सदरचे प्रकरण चालविण्याचे अधिकार नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, औरंगाबाद जिल्हयात राहणा–या कर्मचा–यांव्यतिरिक्त इतर जिल्हयात राहण्याा–या कर्मचा–यांचे प्रकरण या न्यायालयात चालू शकत नाही.

02. व्दितीयपक्षकार पैकी 2 ते 31 या कर्मचा–यांच्या प्रकरणांची वस्तुस्थिती मला माहिती आहे. गणेश सोनवणे हयाची नियुक्तीची तारिख मला सांगता येणार नाही. त्याची नियुक्ती 1996 साली झाली. व्दितीयपक्ष क्र.24 वर कुणाचे नांव आहे हे अभिलेख पाहुन मला सांगता येईल. व्दितीयपक्ष क्र.31 बाळासाहेब काळे यांच्या नियुक्तीची तारीख मला अभिलेख पाहिल्याशिवाय सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, व्दितीयपक्ष क्र.2 ते 31 यांच्या नियुक्तीच्या तारखा वेगवेगळया आहेत. ॲनेक्चर ‘अे’ मध्ये मी कर्मचा–यांच्या नियुक्तीच्या तारखा बॅंकेने दिलेल्या कागदपत्रांवरुन नमूद केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, नियुक्तीची तारिख, कार्यरत असल्याचे ठिकाण व इतर माहिती सदर कर्मचा–यांनी मला दिली होती. हे

म्हणणे खरे नाहीं कीं, मला व्दितीयपक्षकार क्र.2 ते 31 यांच्या दाव्याबददल काहीही माहितीं नाहीं. हे म्हणणे खरे नाहीं कीं, ॲनक्चर 'अे' मधील मजकूर मीं तयार केलेला नाहीं.

03. माझे शिक्षण 8वीं पर्यन्त झालेले आहे. शपथपत्र तयार करण्याकरीता मीं वकीलांनी मराठीतुन माहीती दिली होती व शपथपत्र तयार करतांना माझे वकीलांनी त्यातील मजकूर मराठीतुन मला सांगीतला होता. मीं व इतर कर्मचारी बॅकेसोबत मराठीतुन पत्रव्यवहार करतो. मला इंग्रजीतुन मजकूर लिहीता येतो. हे म्हणणे खरे आहे कीं, माझे सरतपासाचे शपथपत्र मीं स्वतः तयार केलेले नाहीं. आता मला शपथपत्र दाखविले, त्यातील नेमक्या एखादया परिच्छेदाविषयीं सांगता येणार नाहीं. हे म्हणणे खरे नाहीं कीं, मला शपथपत्रातील परिच्छेद वाचता न आल्यामुळे शपथपत्रातील मजकूर माहितीं नाहीं. हे म्हणणे खरे नाहीं कीं, शपथपत्रातील मजकूर समजुन न घेता मीं त्यावर सही केलीं आहे. आमच्या युनियनचे नांव महाराष्ट ग्रामीण बॅक रोजंदारी संदेशवाहक संघटना,औरंगाबाद असे आहे. हे म्हणणे खरे आहे कीं, सदर युनियन रजिस्टर असल्याबाबतचे कागदपत्र मीं दाखल केलेले नाहीं. आजरोजी सदर प्रमाणपत्र मीं आणलेले नाहीं. मीं संदेशवाहक म्हणुन औरंगाबाद–जालना ग्रामीण बॅकेत नोकरीस लागलो होतो. हे म्हणणे खरे आहे कीं, महाराष्ट ग्रामीण बॅकेने मला नियुक्तीपत्र दिलेले नव्हते. हे म्हणणे खरे आहे कीं, माझ्या शपथपत्रात मीं बॅकांचे एकत्रिकरण झाल्याचा मजकूर नमूद केला आहे. हे म्हणणे खरे आहे कीं, पुराव्याच्या परिच्छेदात कर्मचां–यांच्या सेवाशर्तीबाबत मजकूर नमूद केला आहे. दि.25.03.2008 रोजीचे नोटीफिकेशन मीं वाचलेले नाहीं. हे म्हणणे खरे नाहीं कीं, सदर नोटीफिकेशनमध्ये संदेशवाहकाच्या सेवाशर्तीविषयीं काहीहीं उल्लेख नाहीं. हे म्हणणे खरे नाहीं कीं, सदर नोटीफिकेशन मला व व्दितीयपक्षकार क्र.2 ते 31 च्या कर्मचा–यांना लागू होत नाहीं. आता मला नोटीफिकेशन दाखविले. त्यातील मजकूराविषयीं मला सांगता येणार नाहीं. सदर नोटीफिकेशन पक्षकारास उलटतपासात दाखविण्यात आले. त्यामुळे त्यास

निशाणी **यु–98** देण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की, सदर नोटीफिकेशन व्दितीयपक्ष कर्मचां–यांना लागू होत नाही. परिच्छेद क्र.2 मध्ये मी सर्व्हीस कंडीशनबाबतचा उल्लेख केला आहे, सदर ऑर्डरविषयी आता मला सांगता येणार नाही. सदर आदेश आजरोजी मी आणलेले नाहीत. हे म्हणणेखरे नाही की, असे सेवाशर्तीत बदलाव होतील असे कोणतेही आदेश निर्गमित करण्यात आलेले नाहीत तसेच आमच्या सेवाशर्तीत कोणताही बदल करण्यात आलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, माइया शपथपत्रातील बॅकांचे एकत्रिकरण होवुन महाराष्ट ग्रामीण बॅक अस्तित्वात आल्याचा व माझी सेवा ग्रामीण बॅकेत वर्ग झाल्याचा उल्लेख बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की, एकत्रिकरण होण्यापुर्वी माझी पुर्वी जशी नोकरी चालू होती तशी आजही चालू आहे.

04. हे म्हणणे खरे आहे की, बॅकेने वर्तमानपत्रात दिलेली जाहीरात मी प्रकरणात दाखल केलेली नाही व तसेच सदर जाहीरात आजरोजी देखील मी आणलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, बॅकेने कोणतीही जाहिरात संदेशवाहक पदासाठी केलेली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, बॅकेने मला मुलाखतीसाठी बोलविलेले नव्हते. मी व्दितीयपक्ष 1 ते 31 या सर्व कर्मचा–यांचे मुलाखतीचे मुळ पत्र जोडलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे मुलाखतीचे पत्र खोटे तयार करुन दाखल केलेले आहेत.

(प्रथमपक्षाच्या वकीलांनी पुढील उलटतपास घेण्यास मुदत मागीतली. याउलट व्दितीयपक्षाच्या वकीलांनी वेळ देण्यास आक्षेप घेतला. प्रकरणात दाखल असलेल्या कागदपत्रांची एकुण संख्या व स्वरुप पाहता उलटतपास पुर्ण करण्यास संधी देणे योग्य ठरेल. सबब प्रकरण पुढील उलटतपासासाठी तहकुब...)

**श्रवणोत्तर स्विकृत**

सही/–

दिनांकः 09.02.2023

ठिकाणः औरंगाबाद

(एस.एस.सहस्त्रबुध्दे)

पिठासीन अधिकारी,

2रे कामगार न्यायालय क्रं.2, औरंगाबाद.